# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

मा. उपमुख्यमंत्री (पाटबंधारे) व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७.१.९७ रोजी मुंबई येथे झालेल्या नियामक मंडळाच्या ७ व्या बैठकीमध्ये खालील ठरावांना मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्र. ७/१ :-** "ठराव करण्यात येतो की, सहाव्या बैठकीमध्ये झालेले ठराव वाचून कायम करण्यात येत आहेत"

**ठराव क्र. ७/२ :-** "ठराव करण्यात येतो की,

१) भूसंपादन व पुनर्वसन कामांसाठी महसूल खात्यास कर्मचारी वर्ग कमी पडत असल्याने त्यासाठी शासनस्तरावर, आयुक्त पुणे, यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर त्वरीत निर्णय घेण्यात येऊन, कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन द्यावा. तसेच आयुक्त पुणे, यांनी शासनस्तरावर सादर केलेल्या भूसंपादन भरपाई बाबतच्या प्रकरणी तपासणी करण्यासाठी कर्मचारीवर्ग अपुरा पडत असल्याने, मुख्य सचिव यांनी मंत्रालयीन कर्मचाऱ्यांचा आढावा घेऊन, सदर कामासाठी कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन द्यावा.

२) उरमोडी प्रकल्पाचे काम चालू करण्यासाठी जिल्हाधिकारी, सातारा यांनी बुडीत क्षेत्रातील लोकांच्या बैठका घ्याव्यात. प्रकल्पग्रस्त भूधारकांच्या मागण्या रास्त वाटल्यास सानुग्रह अनुदान देण्याबाबत प्रामुख्याने विचार व्हावा.

३) काही प्रकल्पांच्या धरणस्थळांबाबत (उदा. तारळी, वांग इ.) लोकप्रतिनिधी/स्थानिक नेते यांना शंका असल्याने, त्याबाबत क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी संबंधित लोकप्रतिनिधी समवेत क्षेत्रीय पहाणी, आवश्यक तेवढे सर्वेक्षण करुन धरणस्थळाबाबत अंतिम निर्णय घेण्यासाठी सविस्तर अहवाल महामंडळास सादर करावेत.

४) वन विभागाची जमीन प्रकल्पांसाठी संपादीत करतांना द्यावी लागणारी पर्यायी जमीन एकाच ठिकाणी एकत्रित दिली तरी चालते. या संदर्भात शासनास प्राप्त झालेल्या वनविभागास ७०० हेक्टर जमीन द्यावयाच्या प्रस्तावावर एका आठवड्यात निर्णय घेण्यात यावा, जेणेकरुन वनविभागाच्या परवानगीसाठी अडलेले प्रकल्प प्राथम्याने हाती घेता येतील.

५) दूधगंगा प्रकल्पांतर्गत तयार केलेला रस्ता वारंवार पावसाने खराब होत असल्याने, सदरचा रस्ता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने करावा व त्यासाठी आवश्यक मातीकाम महामंडळाने करावयाचे आहे.

६) घटप्रभा (फाटकवाडी) जि. कोल्हापूर या प्रकल्पाचे बांधकाम तावडतोब सुरु करावे.

७) नियामक मंडळाच्या पुढील बैठका अनुक्रमे सातारा, कोल्हापूर व पुणे येथे आयोजित करुन भूसंपादन व पुनर्वसनाच्या कामांबाबत (प्रकल्प निहाय) झालेल्या प्रगतीचा आढावा घेण्यात यावा."

| | | |
|---|---|---|
| उपमुख्यमंत्री (पा) व अध्यक्ष | | कार्यकारी संचालक |
| महामंडळ | | महामंडळ |